अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मुंबईकरांसाठी ही मिनी सुनामी तर नाही ना?

निसर्ग हा नेहमी आपल्या पध्दतीनेच काम करतो. त्याचा आपण कितीही अंदाज बांधण्याचा प्रयत्न केला तरी त्या अंदाजालाही खोटे ठरवण्याचे काम निसर्ग करतो, हेही अनेकवेळेला सिध्द झाले आहे. कोणतीही शक्यता नसताना मुंबईच्या दादर, वरळी परिसरात अचानकपणे समुद्राच्या लाटांनी धुमाकूळ घालावा यावरून पावसाळ्यामध्ये मुंबईकरांची काय दैना होऊ शकते याची सहजपणे कल्पना येऊ शकते. दोन-दोन मीटर उंचीच्या लाटा मुंबईकरांसाठी नव्या नाहीत. परंतु आतापर्यंत कफपरेडपासून ते जुहू चौपाटीपर्यंतच्या किनारपट्टीवर समुद्राने आपली मर्यादा ओलांडली आहे असे घडले नाही. मात्र १२ जूनला दिवसाढवळ्या दादर आणि वरळी परिसरात लाटांनी धडाका दिल्या आणि ते पाणी थेट रस्त्यापर्यंत येऊन पोहचले. मुंबईत झालेल्या २६ जुलैच्या प्रकाराची नुसतीच आठवण लोकांना झाली नाही तर यावेळच्या पावसाळ्यामध्ये २६ जुलैपेक्षाही मोठा प्रकार घडेल की काय, अशी भीतीदेखील लोकांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. या गोष्टीचा ना वेधशाळेला अंदाज आला, ना लोकांनादेखील त्याची पुरेशी कल्पना आली. लाटांचा जोर काहीसा मर्यादित स्वरुपाचा असल्यामुळे मोठ्या प्रकारचे नुकसान टळले. परंतु शहराच्या आत पाणी घुसण्याचा हा प्रकार अगदी सुनामीचीसुध्दा आठवण करून देतो. मुंबईकरांसाठी तर ही मिनी सुनामी तर नाही ना, अशी शंका मनात आल्याशिवाय राहात नाही. यापूर्वी २६ जुलैच्या प्रकाराने सगळे मुंबई शहर अक्षरश: हादरले होते. काही तासांमध्ये धो-धो पडणारा पाऊस मुंबईकरांच्या परिचयाचा असतो. परंतु तो कोणत्या क्षणी विक्रम मोडेल आणि मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवेल हे सांगता येत नाही. वादळवारा नसताना विजांचा कडकडाट किंवा साधे ढगाळ वातावरण नसताना दादरच्या हिंदुजा हॉस्पिटलच्या परिसरात समुद्राचे पाणी येऊन धडकले आणि पावसाळ्यात ज्याप्रमाणे पाणी तुंबते तसे चित्र निर्माण झाले. हा सगळा प्रकार समुद्रातल्या भरतीमुळे झाला. आतापर्यंतची मोठी भरती आल्याने लाटा चौपाटीलाही पार करून आत घुसल्या. मुंबईकरांसाठी २६ जुलैचा जलप्रलय ही गोष्ट जशी अत्यंत नवीन स्वरुपाची होती, तशीच या अवकाळी आलेल्या भरतीच्या लाटाही मनामध्ये भीती निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. मुंबईच्याबाबतीत असा प्रकार कधीही घडला नाही. अगदी २६ जुलैच्या काळातसुध्दा याच दादर, वरळी भागात समुद्राच्या लाटांमुळे पाणी घुसण्याचा प्रकार घडला नव्हता. म्हणूनच ही घटना मुंबईकरांसाठी आणि विशेषत: सगळ्या यंत्रणांसाठी एक सावधानतेचा इशारा देणारी आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

## विज्ञान आणि निसर्गाचे आव्हान

खरे सांगायचे तर गेल्या दहा वर्षांपासून निसर्गाचा लहरीपणा वाढलेला दिसतो. त्याची कोणतीही शाश्वती राहिलेली नाही. मग अगदी गेल्यावर्षी केदारनाथ परिसरात झालेला जलप्रलय असेल किंवा अगदी देशाच्या अनेक भागामध्ये अचानकपणे उठवलेली फयानसारखी वादळे असतील. एवढेच कशाला, महाराष्ट्राचेच उदाहरण घेतले तर महाराष्ट्राच्याच अनेक भागांत विदर्भपासून ते कोकणापर्यंत अवेळी गारपीट होण्याचा प्रकार घडला.अगदी मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात मराठवाडा, खानदेश किंवा नाशिकसारख्या ठिकाणी तडाखेबंद गारपीट झाली. अनेक ठिकाणी तापमानाचीही विक्रमी नोंद झाली. असे सगळे चित्रविचित्र प्रकार सातत्याने सुरू आहेत. ते नेमके कशामुळे होतात, त्यामागची कारणे काय असावीत, हा सगळाच एका मोठ्या अभ्यासाचा विषय ठरतो. कारण ज्या पध्दतीने निसर्गामध्ये बदल घडताना दिसतात आणि अचानकपणे संकटे उभी ठाकतात ती पाहिल्यावर हे केवळ नैसर्गिक बदल आहेत असे म्हणून चालणार नाही. तर मनुष्याच्या अस्तित्वासाठीच ते एक मोठे आव्हान ठरते. काही वर्षांपूर्वी आंध्र आणि तामिळनाडूच्या किनारपट्टीला सुनामीने झोडपून काढले. आतोनात हानी त्यामुळे झाली. दोन वर्षांपूर्वी जपानमध्ये अभूतपूर्व सुनामी आली. इंग्लंड अमेरिका या दोन्ही शहरांना वादळाने वेळोवेळी तडाखे देण्याचे प्रकार घडले. याचा अर्थ एकूणच निसर्ग किंवा सृष्टीच्या व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाल सुरू आहे आणि त्याचा अंदाज अधिक अचूकपणे घेण्याची वेळ आलेली आहे. आजचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मनुष्याला एकीकडे मोठ्याप्रमाणावर सहाय्यभूत ठरत असताना दुसरीकडे निसर्गाच्या या अचानक बदलांचे आव्हानही उभे राहात आहे. याचा मेळ कसा साधायचा अशी कसोटी पाहणारीच ही वेळ म्हणावी लागेल. साधनसुविधा उपलब्ध आहेत, परंतु निसर्गाचा भरोसा नाही अशा प्रकारचे हे चित्र ठरते. परंतु ही गोष्ट कायमसाठीच लक्षात घेऊन उपाययोजना कराव्या लागतील. यासाठीच आपात्कालीन योजनांची स्वच्छता ठेवावी लागेल.२६ जुलैच्या वेळी याच आपात्कालीन यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात नुकसान झाले. आतादेखील अचानकपणे आलेल्या लाटांच्यावेळी मुंबईतल्या आपात्कालीन यंत्रणा किती सज्ज होत्या असा प्रश्न निर्माण होतो.

## भराव आणि अवाढव्य बांधकामे

मुंबईकरांसाठी पूर्णपणे नवीन असलेला प्रकार निश्चितच सावधानतेचा इशारा आहे. हा प्रकार कशामुळे घडला ती कारणे तर शोधावीच लागतील. केवळ पौर्णिमा होती आणि मोठी भरती होती म्हणून या लाटा थेट दादर वरळीच्या रस्त्यावर येऊन पोहचल्या असा इतका साधासुधा निष्कर्श काढून चालणार नाही.तर यामागे मुंबई परिसरातल्या किंवा पश्चिम किनारपट्टीत काही हालचाली सुरू असाव्यात, अन्यथा अचानकपणे अशा प्रकारची ही मिनी सुनामीची घटना घडू शकत नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, मुंबई महानगर हे काही बेटांवर वसलेले आहे.त्याला जागेच्या मर्यादा आहेत. आजुबाजूंनी समुद्राने वेढलेल्या या शहराबाबत निश्चितपणे वेगळा विचार केला गेला पाहिजे. २६ जुलैचा अनुभव आणि आताची ही लाट या दोन्ही अनुभवातून सरकारी यंत्रणांना धडा घ्यावा लागेल. येणाऱ्या पावसाळ्यामध्ये मुंबईकरांसाठी काही चित्रविचित्र घडणार नाही ना याचा अंदाज घ्यावा लागेल. हा सगळाच अभ्यास करत असताना सध्या शहर आणि उपनगरांमध्ये इतकी प्रचंड बांधकामे सुरू आहेत की, त्याची अवाढव्यता पाहिल्यानंतर त्याचाही या भूगर्भीय हालचालीशी काही संबंध येतो का, हे पाहणे गरजेचे ठरते. कफपरेड, नरिमन पॉईंट, बांद्रा रेक्लमेशन याठिकाणी समुद्राला हटवले गेले होते. आता पुन्हा काही ठिकाणी भराव घालण्याच्या सरकारी योजना आहेत. तर मुंबईतल्या अनेक खाड्यांमध्ये असेच भराव टाकले जात आहेत. या सगळ्या गोष्टींचा मिनी सुनामीशी काही संबंध आहे का, हे पाहणे अत्यंत गरजेचे ठरते.